
सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२५४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.६ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# अमेरिकेत पुन्हा एकदा ट्रम्प सरकार
## कमला हॅरिस यांना पराभूत करत मिळवला दणदणीत विजय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

संपूर्ण जगाचं लक्ष लागून असलेल्या अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची मतमोजणी सुरू असून, आतापर्यंतच्या निकालांमधून रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे पुढील अध्यक्ष असतील हे स्पष्ट झाले आहे. अटीतटीची लढत असल्याचे सांगण्यात येत असलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी आज मतमोजणीला सुरुवात झाल्यापासूनच जोरदार मुसंडी मारत डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्यावर



विजयी आघाडी घेतली. डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे ४७ वे राष्ट्रपती म्हणून जानेवारी महिन्यात शपथ घेतील.

अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत विजयी होण्यासाठी ५३८ इलेक्टोरल मतांपैकी २७० मतं मिळवणं आवश्यक असतं. दरम्यान आतापर्यंत ४८१ निकाल हाती आले असून, त्यामध्ये डोनाल्ड ट्रम्प यांना २६७ इलेक्टोरल मतं मिळाली आहेत. तर कमला हॅरिस यांना २१४ इलेक्टोरल मतं मिळाली आहे. मात्र डोनाल्ड ट्रम्प हे विस्कॉन्सिन, मिशिगन, ॲरिझोना, नेवाडा आणि अलास्का या राज्यांमध्ये आघाडीवर असल्याने ते तीनशेपार मजल मारतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

२०२० मध्ये झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत तत्कालीन राष्ट्राध्यक्ष असलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांना डेमोक्रॅटिक पक्षाच्या जो बायडन यांच्याकडून पराभूत व्हावं लागलं होतं. मात्र पराभवाचा धक्का बसल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी २०२४ च्या निवडणुकीसाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली होती. तसेच त्यांनी आक्रमक प्रचार करत रिपब्लिकन पक्षाकडून उमेदवारीही मिळवली होती. त्यांच्यासमोर डेमोक्रॅटिक पक्षाकडून कमला हॅरिस यांनी आव्हान उभं केलं होतं. मात्र अटीतटीची मानली जाणारी ही अध्यक्षीय निवडणूक डोनाल्ड ट्रम्प यांनी सहजपणे जिंकली. त्यांनी अध्यक्षीय निवडणुकीत इलेक्टोरल मतांसह पॉप्युलर मतांमध्येही कमला हॅरिस यांना मात दिली आहे.







## प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनो निवडणूक प्रचारात सहभागी व्हाल तर कठोर कारवाई होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

राज्यातील अकृषी विद्यापीठे, संलग्न महाविद्यालयांमधील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कोणत्याही राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचार कामात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास त्यांच्या विरोधात संबंधित विद्यापीठे आणि शिक्षणसंस्थांनी शिस्तभंगविषयक कठोर करावाई करावी, असे निर्देशच उच्चशिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिले आहेत. या आदेशामुळे प्राध्यापकांमध्ये खळबळ उडाली आहे.



उच्चशिक्षण संचालक डॉ. देवळाणकर यांनी काढलेल्या पत्रानुसार निवडणूक आयोगाने आचारसंहिता नियमाचे पालन करण्यासाठी विविध निर्देश दिले आहेत. त्यात शासन निर्णय २० मे २०१० अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सामाईक परिनियम (कॉमन स्टॅट्यूट) अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी लागू केलेल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ५(१) मध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही, त्यांच्याशी संबंध ठेवता येणार नाही, कोणत्याही राजकीय चळवळीत, कार्यात भाग घेता येणार नाही किंवा साहाय्य करता येणार नाही अशी तरतूद आहे. तसेच ५(४) नुसार तो कर्मचारी कोणत्याही विधानसभेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीत प्रचार करू शकणार नाही किंवा हस्तक्षेप करू शकणार नाही किंवा त्यासंबंधी आपले वजन खर्च करू शकणार नाही किंवा त्यात भाग घेऊ शकणार नाही, याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी कोणत्याही पक्षांच्या प्रचारात सहभाग घेतल्यास संबंधितांवर कारवाई करावी, असेही संचालक डॉ. देवळाणकर यांनी स्पष्ट केले आहे.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या प्रचार सभांचा धडाका; शुक्रवारी पहिली सभा कोल्हापुरात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६कोल्हापूर**

आागामी विधानसभा निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत. या पार्श्वभूमीवर भाजप नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे शुक्रवार ८ नोव्हेंबरला कोल्हापूर दौऱ्यावर येत असून, त्यांची सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार आहे.

महायुतीची राज्यातील पहिली जाहीर सभा काल कोल्हापूर उत्तर मतदारसंघात झाली. त्यामुळे आता अमित शाह यांची सभा कोल्हापूर दक्षिणमध्ये भाजपचे उमेदवार अमल महाडिक यांच्या मतदारसंघात ही सभा घेण्यात



येणार आहे. या सभेची जागा अजून निश्चित झालेली नाही.

कोल्हापूरचे जावई असलेल्या अमित शहा यांचे कोल्हापूरकडे विशेष लक्ष असते. लोकसभेलाही त्यांनी संजय मंडलिक यांच्या प्रचारासाठी कोल्हापूरमध्ये जाहीर सभा घेतली होती. यानंतर त्यांनी ऑक्टोबरमध्ये येथील महासैनिक दरबार हॉलवर पश्चिम महाराष्ट्रतील पाच जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला होता. आता राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमित शाह यांच्या सभांचा धडाका पाहायला मिळणार आहे.

अमित शाह यांची कोल्हापुरात पहिली सभा होणार आहे. कोल्हापूर दक्षिण मतदारसंघात अमल महाडिक आणि काँग्रेसचे आमदार ऋतुराज पाटील यांच्यात लढत असल्याने भाजपने ही जागा प्रतिष्ठेची केली आहे. कोल्हापूर दक्षिण येथील सभेनंतर अमित शाह यांची सांगली - जत, सातारा -कराड दक्षिण आणि पुणे येथील पर्वती मतदारसंघात सभा होणार असल्याचे म्हटले जात आहे.

## काहीही झालं तरी जात निहाय जनगणना होणार अन् आरक्षणाची ५० टक्यांची मर्यादा हटवणारच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

जात निहाय जनगणनेवर मी बोलतो तेव्हा नरेंद्र मोदी माझ्यावर देश तोडण्याची भाषा करतो असा आरोप करतात. जात निहाय जनगणनेवर काय भूमिका घ्यायची यावर RSS मध्येही मंथन सुरू आहे. त्यांनी कोणतीही भूमिका घेतली तरी जात निहाय जनगणना करण्यापासून कोणीही रोखू शकत नाही आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादासुद्धा हटवली जाईल असा निर्धार



राहुल गांधी यांनी व्यक्त केला. नागपूरात आयोजित संविधान सन्मान संमेलनात राहुल गांधींनीभाजपा आणि आरएसएसवर तोफ डागली.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान हे केवळ एक पुस्तक नाही तर जगण्याचा मंत्र आहे. संविधानात भगवान बुद्ध, सम्राट अशोक, महात्मा बसवेश्वर, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई अशा महापुरुषांचा आवाज आहे. संविधानातील विचार हजारो वर्षांपूर्वीचे आहेत. संविधानात सर्व जाती, धर्माचा, प्रदेशाचा आदर आहे. याच संविधानावर भाजपा व आरएसएस सातत्याने हल्ले करत आहेत. आरएसएस संविधानावर थेट हल्ला करु शकत नाहीत तर ते लपून हल्ला करतात.

## घटनेच्या प्रतीला 'लाल' कव्हर, राहुल गांधींना अर्बन नक्षल्यांनी घेरलंय; फडणवीसांचा थेट हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नागपूर**

एकीकडे घटनेची प्रत उंचावून दाखवायची आणि दुसरीकडे अराजकतावादी शक्तींच्या पाशात अडकायचे, संविधानाचा आग्रह एकीकडे धरायचा आणि दुसरीकडे या संविधानाला मूठमाती देऊ पाहणाऱ्या शक्तींना गोंजारायचे अशी बेगडी वृत्ती त्यातून दिसते. राहुल गांधी यांनी काँग्रेसच्या विचारांना केव्हाच बगल दिली असून ते पूर्णपणे अर्बन नक्षल्यांच्या अविचाराने घेरले गेले आहेत, अशी सडकून टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.



माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, घटनेची प्रत ते अनेक प्रसंगांमध्ये दाखवतात. नेहमीच्या निळ्या रंगाऐवजी त्या घटनेच्या प्रतीला लाल कव्हर लावलेले असते. अराजकतावादी आणि अर्बन नक्षलवाद्यांनी राहुल गांधी यांना घेरले आहे. त्यांनी भारत जोडो यात्रा काढली तेव्हा असे वाटले होते की चला! काही नाही तर भारत जोडायला तरी निघाले आहेत पण प्रत्यक्षात काय घडले? त्यांच्या यात्रेमध्ये १८० संघटना अशा होत्या, ज्या विध्वंसक मानल्या जातात, हे मी म्हणतो म्हणून नाही तर ते रेकॉर्डवर आहे, या शब्दांत देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला.


लोकसभा निवडणुकीला भाजपा, पंतप्रधान मोदींविरुद्ध जे नरेटिव्ह काँग्रेसकडून पसरविण्यात आले त्याचा एक फटका तुम्हाला बसला, त्या नरेटीव्हचा परिणाम विधानसभा निवडणुकीतही बसेल का, असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना, लोकसभेवेळी भाजपा संविधान बदलणार अशी आवई उठविली गेली, त्यातील फोलपणा आता सिद्ध झाला आहे. संविधानाला धक्का लावला जाणार नाही अशी ग्वाही मोदींनी दिलीच आहे. राहुल गांधी अमेरिकेत बोलताना म्हणाले की, कालांतराने आरक्षण समाप्त केले जाईल, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राहुल गांधींच्या विधानांचे समर्थन केले. व्होट जिहाद लोकसभेवेळी झाला. त्याचा फटका आम्हाला दहा लोकसभा मतदारसंघांमध्ये बसला. भाजपाच्या विरोधात मतदान करा, असे सांगितले गेले. त्यातून अल्पसंख्यकांची मते भाजपाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात जातील हे बघितले गेले. आपली फसवणूक मविआने केल्याचे अल्पसंख्यकांनाही कळले आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

दरम्यान, नागपुरात होत असलेल्या ओबीसी सन्मान संमेलनात राहुल गांधी भाषण देणार आहेत, मात्र या संमेलनात पत्रकारांना मज्जाव करून लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची गळचेपी करण्यात आली आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

# सर्वच खासगी मालमत्ता जप्तीचा अधिकार सरकारला नाही
## सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठाचा ७:२ बहुमताने निकाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६नवी दिल्ली**

सार्वजनिक हितासाठी सर्वच खासगी मालमत्तांचे अधिग्रहण करण्याचा अधिकार सरकारला राज्यघटनेने दिलेला नाही. मात्र काही प्रकरणांमध्ये सरकार खासगी मालमत्तांचे अधिग्रहण करू शकते, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठाने ७-२ अशा बहुमताने मंगळवारी दिला. राज्यघटनेच्या ३९ (ब) या कलमानुसार सर्व खासगी



मालमत्ता सरकार ताब्यात घेऊ शकते, हा सर्वोच्च न्यायालयाचे न्या. कृष्ण अय्यर यांनी १९७८ साली म्हणजे ४५ वर्षांपूर्वी दिलेला निर्णय घटनापीठाने फिरवला.

सर्व खासगी मालमत्ता ही समाजासाठी उपलब्ध असलेली भौतिक संसाधने मानायची का तसेच अशा मालमत्तेचे सरकार अधिग्रहण करू शकते का, या कायदेशीर प्रश्नाचा विचार सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठाने केला.

**मुंबईतील संघटनेची प्रमुख याचिका**

सार्वजनिक हितासाठी सरकार सर्व खासगी मालमत्ता ताब्यात घेऊ शकते का, या प्रश्नासंदर्भात करण्यात आलेल्या १६ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेतली होती. मुंबईतील प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशनने (पीओए) दाखल केलेल्या प्रमुख याचिकेचा त्यात समावेश होता. महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) कायद्याच्या चॅप्टर ८-अ याला पीओएच्या याचिकेत विरोध करण्यात आला होता.

७० टक्के रहिवाशांनी डागडुजी करण्याची विनंती केली तर उपकरप्राप्त जीर्ण इमारती व ती इमारत बांधलेली जमीन ताब्यात घेण्याचा राज्य प्राधिकरणाला अधिकार आहे असे त्यात म्हटले आहे. हा चॅप्टर १९८६ साली या कायद्यात समाविष्ट करण्यात आला होता. राज्यघटनेतील ३९क (ब) कलमाच्या अनुषंगाने म्हाडा कायदा लागू करण्यात आला होता.

## ऐन निवडणुकीत सर्वोच्च न्यायालयाकडून अजित पवारांना आदेश
### पक्षचिन्हाबाबत दिला ३६ तासांचा अल्टिमेटम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ६ नवी दिल्ली**

राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधुमी सुरू आहे. वर्षभरापूर्वी अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात बंडखोरी केली. ४० आमदारांना घेऊन ते भाजपाबरोबर महायुतीत सामील झाले. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या



पार्श्वभूमीवर शरद पवारांनी अजित पवारांविरोधात सर्वोच्च न्यायालयात पक्षचिन्हाबाबत धाव घेतली होती. त्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाने अजित पवारांना ३६ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. येत्या ३६ तासांत अजित पवारांना पक्षचिन्हाबाबत खुलासा करणारी सूचना राज्यातील वर्तमानपत्रांत छापायची आहे. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (राष्ट्रवादी) अध्यक्ष अजित पवार यांनी बुधवारी ६ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाला आश्वासन दिले की ३६ तासांच्या आत मराठी दैनिकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घड्याळ चिन्हाचाबाबत अस्वीकरण प्रसिद्ध केले जाईल. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, असं या अस्वीकरण पत्रकात असेल. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या तोंडी निर्देशाला उत्तर देताना अजित पवार यांच्या वतीने ज्येष्ठ वकील बलबीर सिंग यांनी हे आश्वासन दिले.

विदर्भ प्रजासत्ताक

कुरुक्षेत्र महाराष्ट्र

https://epaper.vidarbhaprajasattak.com

२

बुधवार दि. ६ नोव्हेंबर २०२४





## संपादकीय ......

# शिक्षणावरील खर्चात वाढ

संयुक्त राष्ट्राचे जागतिक पातळीवरील शिक्षण धोरण निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार्या 'युनेस्को'च्या मते, २०१५ ते २०२४ या काळात भारताने जीडीपीच्या ४.१ ते ४.६ टक्के खर्च शिक्षणावर केला. हा आकडा 'युनेस्को'ने जारी केलेल्या 'शिक्षण–२०३० : अत्यावश्यक पाऊल' या मार्गदर्शक सूचनेशी सुसंगत आहे. या सूचनेनुसार जगातील प्रत्येक देशांनी शिक्षणावर जीडीपीच्या चार ते सहा टक्के खर्च करायला हवा.

युनेस्कोने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात केंद्र आणि राज्य सरकारने २०१५ ते २०२४ या काळात एकूण सरकारी खर्चातील शिक्षण क्षेत्राचा वाटा १३.५ टक्क्यांवरून १७.२ टक्क्यांवर नेला आहे. हे आकडे युनेस्कोच्या धोरणाला अनुरूप असून हे धोरण जगातील सर्वच सरकारकडे एकच मागणी करते आणि ती म्हणजे सरकारी बजेटच्या किमान १५ ते ३० टक्के शिक्षणावर खर्च करा. जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त शाश्वत विकासाचे ध्येय–२०३० नुसार जगभरातील देशांना एकूण १७ उद्दिष्टे गाठायची असून त्यापैकी चौथ्या क्रमाकांचे ध्येय सर्वांना गुणवत्तापूर्ण सर्वसमावेशक शिक्षण प्रदान करण्याचे आहे आणि म्हणूनच भारतासंदर्भात 'युनेस्को'ने जारी केलेला आकडा महत्त्वाचा आहे. 'युनेस्को'च्या मते, गेल्या काही वर्षांत प्रामुख्याने कोरोनानंतर जगभरातील सरकारांनी शिक्षणावरचा खर्च कमी केला आहे; पण भारतात मात्र खर्चाचे प्रमाण कमी झालेले दिसत नाही आणि तो स्थिर आहे. २०१० नंतर मध्य आणि दक्षिण आशियाई देशांत शिक्षणावरची तरतूद आणि खर्च वाढताना दिसतो. काही लहान देशांच्यां खर्चाचे प्रमाण कमी–जास्त राहू शकते; मात्र त्यांचा खर्च पाहिला, तर एकूण तरतुदीच्या तुलनेत हे प्रमाण खूपच कमी दिसून येते.

'युनेस्को'च्या मते, संपूर्ण आशियात भारताचा शिक्षणावरचा खर्च जपान अणि चीनपेक्षा अधिक राहिला आहे; पण भारत सरकार आता कोठारी आयोगाच्या (१९६४–६५) शिफारशी लागू करण्यासंदर्भात ठोस पावले उचलेल का, असा प्रश्न उपस्थित होतो. यात जीडीपीच्या सहा टक्के खर्च शिक्षणावर करण्याचा मुद्दा मांडला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्येही १९६८ च्या जीडीपीच्या सहा टक्के खर्च शिक्षणावर करण्याच्या ध्येयाला दुजोरा दिला आहे. त्यांच्या मते, हे धोरण शिक्षणावरील तरतूद वाढविण्याच्या ध्येयाला बांधील आहे. कारण, कोणतीही अन्य तरतूद किंवा खर्चाचे नियोजन हे तरुण पिढीच्या शिक्षणासमोर महत्त्वाचे नाहीत. शिक्षणावर आपण किती खर्च करतो, यावर अर्थतज्ज्ञ आणि शिक्षण तज्ज्ञांत मतैक्य झालेले नाही. यामागचे कारण म्हणजे, आपल्या देशात शिक्षणावर सरकारी आणि वैयक्तिक खर्चाचे आकडे वेगवेगळे आहेत. सरकारी खर्चाचे आकडेमोड करण्यासाठी केंद्र अणि राज्य सरकारच्या खर्चाला एकत्र केले जाते. केंद्राच्या पातळीवर खर्चाची गणना गुंतागुंतीची राहते. कारण, शिक्षण मंत्रालयाशिवाय अन्य सर्व मंत्रालयेही यासाठी खर्चाची तरतूद करत असतात. आता प्रश्न असा की, देशात सरकारकडून शिक्षणावर एकूण किती खर्च केला जातो. २०१९–२० मध्ये शिक्षणावर एकूण सरकारी खर्च ८.९३ लाख कोटी रुपये राहिला आहे. यात केंद्र सरकारचा खर्च २.२७ लाख कोटी रुपये आणि राज्य सरकारचा खर्च ६.६६ लाख कोटी रुपये राहिला आहे. चालू आर्थिक वर्षात अंदाजित १२ लाख कोटी रुपये खर्च होत आहेत.

ही आकडेवारी सकारात्मक असून भारताच्या शिक्षण क्षेत्रावरचा सरकारी खर्च आणि तरतूद ही जगातील अन्य देशांप्रमाणे कमी होताना दिसत नाही; पण भविष्यातील संधी आणि राष्ट्रीय ध्येयधोरणे पाहता आपल्याला शिक्षणावर सध्याच्या तरतुदीत अधिक भर घालावी लागणार आहे आणि त्यात सातत्याने वाढ करावी लागणार आहे. येत्या दहा वर्षांत जमीन आणि उद्योगासाठी जागतिक युद्ध होणार नसले, तरी प्रतिभा आणि गुणवत्तेसाठी देशातील स्पर्धा वाढणार आहे; मात्र शिक्षण आणि आरोग्यावर अधिक खर्च केल्यास आणि मानवरूपी भांडवलाचा सतत विकास केला, तरच आपण ही लढाई, स्पर्धा जिंकणार आहोत.

# इच्छुक उमेदवारांचा महासमजूतदारपणा



महाराष्ट्र राज्याच्या नावामध्येच 'महा' शब्द असल्यामुळे आपल्या राज्यात सर्व काही महानच आहे. येणारी निवडणूकसुद्धा महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यामध्येच होत आहे. साहजिकच निवडणुकीला उभे राहिलेले सर्व उमेदवार महाउमेदवार आहेत. अर्ज भरताना असंख्य महाबंडखोरांनी महाअर्ज भरल्यामुळे राजकीय पक्षांची मोठीच पंचायत होऊन बसली होती; पण सुमारे तीन हजार इच्छुक उमेदवारांनी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी माघार घेऊन महासमजूतदारपणा दाखवला आहे, असे आपल्या लक्षात येईल.

आपल्या विरोधी कोणी भूमिका घेत असेल, तर त्याला समजावून सांगणे हा पहिला पर्याय असतो. या निवडणुकीत बंडखोरी केली, तर ती हाराकरी होईल, तुमचे राजकीय करिअर संपुष्टात येईल, त्यापेक्षा आता माघार घ्या, भविष्यात पक्ष तुमची योग्य ती दखल घेईल, असे समजावून सांगितले जाते. जे समजूतदार बंडखोर होते त्यांनी आपले अर्ज मागे घेतले.

बर्याचशा बंडखोरांनी आपले अर्ज मागे घेतले नाहीत. त्यांचे दोन उद्देश असतात. पहिला उद्देश म्हणजे, पक्षाने जो अधिकृत उमेदवार दिला आहे, त्याला या निवडणुकीत पराभूत करणे होय. उमेदवारी मिळालेली व्यक्तीही या बंडखोरांची सहकारीच असते आणि बरेचदा ते एकमेकांचे मित्रही असतात. बंडखोर उमेदवारांच्या वयावर तुम्ही लक्ष टाकले, तर सुमारे ६० ते ६५ वयाचे बंडखोर जास्त प्रमाणात दिसून येतील. उदाहरणार्थ, एखाद्या बंडखोराचे वय ६५ आहे असे समजा. या निवडणुकीत तो आमदार होऊ शकला नाही, तर पुढची निवडणूक सुमारे पाच वर्षांनी लागेल तेव्हा हा उमेदवार ७० वर्षांचा झालेला असेल. तो अजून जास्त थकलेला असेल. अशावेळी तो 'अभी नही तो कभी नही' या निकराने निवडणुकीसाठी उभा राहिलेला असतो. सर्वोच्च नेत्यांनी समजूत घातली, तरी हा ऐकायला तयार नसतो. कारण, त्याचे ठरलेले असते. जनतेचा आग्रह आहे म्हणून निवडणूक लढवत आहे, कार्यकर्त्यांचा आग्रह आहे म्हणून मी उभा आहे, अशा सबबी हे उमेदवार सांगत असतात.

बंडखोरांचा दुसरा उद्देश म्हणजे, मतांच्या साठमारीत कदाचित आपण अपक्ष निवडून येऊ शकतो असेही बर्याच लोकांचे कॅल्क्युलेशन असते. अपक्ष म्हणून निवडून आले की, नंतर सत्तेचे समीकरण जुळण्यासाठी काम पडले, तर तो आपल्या पक्षाकडे जाऊ शकतो किंवा थेट विरोधी पक्षाकडे जाऊ शकतो. याचे कारण म्हणजे, अपक्ष हा स्वतंत्र असतो. त्याला कोणाचे आदेश मानायचे नसतात किंवा कोणाला काही उत्तर द्यायचे नसते. ज्या जनतेमधून निवडून आलो त्या जनतेला तर विचारण्याची कुणालाच गरज नसते.उमेदवारांनी अर्ज मागे घ्यावेत म्हणून शेवटच्या क्षणापर्यंत त्यांची समजूत घालण्यात आली आणि राज्यातून सुमारे तीन हजार लोकांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. यापैकी फुटकळ अर्ज दाखल करणार्यांनी प्रमुख उमेदवारांकडून लाख–दोन लाख रुपये काढले आणि आपले अर्ज मागे घेतले आहेत. यालाच आम्ही 'महासमजूतदारपणा' असे म्हणत आहोत. इतका समजूतदारपणा राजकीय नेत्यांनी दाखवला, तर येत्या काही वर्षांत महाराष्ट्राला 'राजकीय नंदनवन' म्हणायला हरकत नाही. या महानिवडणुकीत महासमजूतदार जनता कुणाला सत्तेवर आणते, हे पाहणे मनोरंजक ठरणार आहे.

# क्वालिटी हुरड्यासाठी कशी कराल ज्वारी लागवड

**दि.६विदर्भ प्रजासत्ताक**

साधारणपणे राज्यात हुरडा सिझन ४५ ते ६० दिवस चालतो. हुरडा चवीस सरस, गोड, मऊ, भाजलेल्या हिव्या दाण्याचा हुरडा पर्यटकांना आकर्षित करत आहे.हिरव्या दाण्याचा हुरडा अतिशय स्वादिष्ट लागतो. कारण त्यावेळेला या दाण्यामध्ये मुक्त अमिनो आम्ले, साखर, विद्राव्य प्रथिने, जीवनसत्वे यांचे प्रमाण अधिक असून पिष्टमय पदार्थांचे प्रमाण कमी असते.

**जमीन व पूर्वमशागत**

ज्वारीपेरणीपूर्वी जमिनीची नांगरट केल्यास जमिनीत पाणी मुरण्यास मदत होते. त्याकरिता पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी जमिनीची बांधबंदिस्ती करावी. सारा यंत्राने वाफे पाडून त्यामध्ये बळीराम नांगराने बांधणी करावी. त्यामुळे पावसाचे पाणी पूर्णपणे वाफ्यात साचून जमिनीत मुरण्यास मदत होते.

**पेरणीची योग्य वेळ**

१५ सप्टेंबर १५ ऑक्टोबर.

पेरणी वेळेत का करावी?

खोडमाशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी व भरपूर उत्पादन मिळण्यासाठी ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात पेरणी करावी.

लवकर पेरणी केली तर (१५ सप्टेंबर अगोदर) तर खोडमाशीमुळे मोठ्या प्रमाणात पोंगे मर होते. उशिरा पेरणी केल्यास जमिनीचा ओलावा कमी झाल्यामुळे बियाण्याची उगवण कमी होते.

आर्थिक फायद्यासाठी टप्प्या टप्प्याने लागवड करावी. मात्र कीड व रोगांपासून संरक्षण करण्यासाठी बीजप्रक्रिया अतिशय महत्वाची.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून १५ दिवसाच्या अंतराने पेरणी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत पेरणी शक्य.

पेरणी अंतर व हेक्टरी बियाणे

दोन ओळीतील अंतर ४५ से.मी. व दोन रोपातील अंतर १५ से.मी. ठेवावे.

पेरणीकरिता हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे.

**बीजप्रक्रिया**

प्रति किलो बियाण्यास ४ ग्रॅम गंधक चोळावे. त्यानंतर २५ ग्रॅम प्रत्येकी अॅझोटोबॅक्टर व पीएसबी या जैविक खतांची बीजप्रक्रिया करावी.

थायमिथोक्झाम (७० टक्के) ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया केल्यास खोडमाशीमुळे होणारी पोंगेमर कमी होते.



खत व्यवस्थापन

मध्यम जमिनीत पेरणी करताना प्रति हेक्टरी ४० किलो नत्र व २० किलो स्फुरद म्हणजेच ८७ किलो (सर्वसाधारणपणे दोन गोण्या) युरिया व १२५ किलो (सर्वसाधारणपणे अडीच गोणी) एसएसपी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे.

भारी जमिनीत पेरणी करतेवेळी प्रति हेक्टरी ६० किलो नत्र व ३० किलो स्फुरद म्हणजेच १३० किलो युरिया (सर्वसाधारणपणे अडीच गोणी) व १८७ किलो एसएसपी (सर्वसाधारणपणे पावणे चार गोणी) द्यावे.

बागायती ज्वारीसाठी, मध्यम व खोल जमिनीकरिता प्रति हेक्टरी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश म्हणजेच १७४ किलो युरिया (सर्वसाधारणपणे साडेतीन गोणी), २५० किलो एसएसपी (सर्वसाधारणपणे पाच गोणी) व ६७ किलो एमओपी (सर्वसाधारणपणे सव्वा गोणी) याप्रमाणे खते द्यावीत.

बागायती ज्वारीच्या पेरणीच्या वेळी संपूर्ण स्फुरद, पालाश व अर्धे नत्र द्यावे. उर्वरित नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी पहिली खुरपणी झाल्यावर द्यावे.

भारी जमिनीत प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. त्याकरिता २१७ किलो युरिया (सर्वसाधारणपणे सव्वाचार गोण्या), ३०८ किलो एसएसपी (सर्वसाधारणपणे सहा गोणी) व ८४ किलो एमओपी (सर्वसाधारणपणे पावणे दोन गोणी) द्यावे.

पेरणी करतेवेळी संपूर्ण स्फुरद, पालाश व अर्धे नत्र द्यावे. उर्वरित नत्र साधारणपणे पेरणीनंतर एक महिन्यांनी पहिली खुरपणी झाल्यावर द्यावे.

कोरडवाहू रब्बी ज्वारीस पेरणीच्या वेळी ५०:२५:२५ नत्रः स्फुरदः पालाश प्रति हेक्टरी दोन चाड्याच्या पाभरीने द्यावे. त्याकरिता साधारणपणे दोन गोणी युरिया, तीन गोण्या एसएसपी व एक गोणी एमओपी या प्रमाणे खतांची मात्रा द्यावी.

आंतरमशागत

ज्वारीची उगवण झाल्यावर १० ते १२ दिवसांनी विरळणी करावी. पिकाच्या सुरवातीच्या ३५ ते ४० दिवसात पीक तण विरहित ठेवावे.

पेरणीनंतर आवश्यकतेनुसार १ ते २ वेळा खुरपणी करावी आणि तीन वेळा कोळपणी करावी.

पहिली कोळपणी पेरणीनंतर तीन आठवड्यांनी फटीच्या कोळप्याने करावी.

दुसरी कोळपणी पेरणीनंतर पाच आठवड्यांनी पासच्या कोळप्याने करावी. त्यामुळे रोपांना मातीचा आधार मिळतो.

तिसरी कोळपणी आठ आठवड्यांनी दातेरी कोळप्याने करावी. त्यामुळे जमिनीच्या भेगा बुजवण्यास मदत होऊन जमिनीतील ओल्याव्याचे बाष्पीभवन न होता जमिनीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होते.

**पाणी व्यवस्थापन**

कोरडवाहू ज्वारीस संरक्षित पाण्याची सोय असल्यास पीक गर्भावस्थेत असताना पेरणीनंतर २८ ते ३० दिवसांनी किंवा पीक पोटरीत असताना ५० ते ५५ दिवसांनी द्यावे.

दोन पाणी देणे शक्य असल्यास वरील दोन्ही नाजूक अवस्थेत ज्वारीला पाणी द्यावे.

बागायती ज्वारीस मध्यम जमिनीत तिसरे पाणी फुलोऱ्यात असताना पेरणीनंतर ७० ते ७५ दिवसांनी द्यावे.

पेरणीनंतरच्या व्यवस्थापनामुळे उत्पादनात २० टक्के भरीव वाढ होते.




## गुडघ्यांमध्ये तीव्र वेदना–पाय खूप दुखतात? ग्लासभर दुधात ४ पदार्थ घालून प्या; गुडघेदुखीचा त्रास होणार नाही

**दि. ६ विदर्भ प्रजासत्ताक**

हळदीचं दूध ओव्हरऑल आरोग्यासाठी फायदेशीर ठरतं. ज्यामुळे रोगप्रतिकारकशक्ती चांगली होण्यास मदत होते याशिवाय शारीरिक वेदनांपासूनही आराम मिळतो. ज्यामुळे पचनक्रियाही चांगली राहते. कारण हळदीत एंटीइन्फ्लेमेटरी गुण असतात. एंटीऑक्सिडेंट्स, एंटीट्यूमर, एंटीसेप्टिक, एंटीव्हायरल, कार्डियोप्रोटिक्टिव्ह, हेपटोप्रोटेक्टिव्ह गुण असतात.

प्रोटीन कॅल्शियम शिवाय दुधात फॉस्फरस, व्हिटामीन ए, व्हिटामीन डी, रायबोफ्लेविन, नियासिन, पँटोथेनिक एसिड, कोबालाबिन, आयोडीन, पोटॅशियम, सेलेनियम आणि जिंक असते. यातील पोषक तत्व शरीराला फायदे देतात. हळदीशिवाय इतर मसाले तुम्ही दुधात मिक्स करून पिऊ शकता. ज्यामुळे शरीराला वेगवेगळ्या पद्धतीनं फायदा होतो.

हळदीचं दूध पिण्याची योग्य वेळ कोणती

तुम्ही हळदीचं दूध सकाळी, संध्याकाळी कोणत्याही वेळी पिऊ शकतात. रात्रीच्यावेळी प्यायल तर यातील पोषक तत्व तुम्हाला पुरेपूर मिळतील. शरीरात या पोषक तत्वांचे अवशोषण होण्यास मदत होईल. दिवसभराचा थकवा कमी होईल आणि चांगली झोप येण्यासही मदत होईल.

यामुळे फक्त मांसपेशी मजबूत होत नाही तर रक्त शर्करा स्तर नियंत्रित होण्यास मदत होते. बदलत्या वातावरणात खोकला, फ्लू, सर्दी पासून आराम मिळवण्यासाठी हळदीच्या दुधाच्या सेवन करायला हवे. रात्री हळदीचे दूध प्यायल्यानं हॉर्मोनल संतुलन चांगले राहते. अनियमित मासिकपाळीचा त्रास दूर करण्यासाठीही हा एक उत्तम उपाय आहे.

हळदीच्या दुधात ४ पदार्थ मिसळा



१) जर तुम्हाला डायबिटीस, हृदयरोग, सांधेदुखी यांसारखे त्रास उद्भवत असतील तर हळदीच्या दुधात जायफळ मिसळून प्या.

२) जर तुम्हाला थायरॉईडची समस्या असेल किंवा रात्री पायांमध्ये ठणक येत असेल तर दुधात काजू मिसळून याचे सेवन करा.

३) जर तुम्हाला कमी एनर्जी असल्यासारखं वाटत असेल तर तुम्ही यात हालिम मिसळून पिऊ शकता.

४) हळदीच्या दूधात चिमुटभर काळी मिरी मिसळल्यास घसादुखी आणि संक्रमणापासून लढण्यास मदत होते. जर तुम्हाला डेअरी उत्पादनांपासून पूर्णपणे लांब राहायचे असेल तर तुम्ही संध्याकाळी ४ ते ५ वाजताच्या दरम्यान चिमुटभर हळद, सुकं खोबरं आणि गूळाचे सेवन करू शकता.

# मेळघाटात चिकन गुनियाचे पुनरागमन

## सांधेदुखीमुळे गावागावात आदिवासी अडचणीत

### चिखली, हिराबंबईत जास्त रूग्ण

विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती फोटो घेणेधारणी व चिखलदरा तालुक्यात सध्या सांधेदुखी आणि चिकनगुनिया सदृष्य रोगांमुळे सामान्य आदिवासी प्रचंड प्रभावित झाल्याने सार्वजनीक आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. हिराबंबई व चिखली गावात अनेक रूग्ण असल्याची माहिती आहे.

चिकन गुनियाने एक दशकापूर्वी पूर्ण देशाला झोडपून काढलेले होते. ज्या लोकांना त्यावेळी चिकन गुनिया झाला होता, अशांना हमखास यावेळी घुडगे, कोपर, पंजा आणि मानेचा त्रास होत आहे. शरीरात सांधेदुखीमुळे सध्या प्रत्येक गावात शेकडोंच्या संख्येने रूग्ण निघतआहेत. धारणी येथील उपजिल्हा रूग्णालय आणि प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात अशा रूग्णांची गर्दी आहे. या शिवाय खाजगी डॉक्टरांच्या क्लिनिक समोर सांधेदुखी आणि चिकन गुनियासदृष्य रोगाच्या रूग्णांची एकच गर्दी होतांना दिसत आहे. सांधेदुखी आणि इतर हाडाच्या जोडांच्या दुखण्यामुळे शरीरात अचानक कमजोरी येऊन शारीरात तापाचा संचार होत आहे. चिकन गुनियाच असल्यामुळे खासगी डॉक्टरांचे म्हणने असेल तरी सरकारी स्तरावर हा युक्तीवाद अमान्य करण्यात आलेला आहे. माहितीनुसार, चिकन गुनिया सदृष्य रोगांचा प्रादुर्भाव मच्छरांमुळे होत असतो म्हणजे मेळघाटच्या अनेक गावात गटारी सांडपाण्याने तुडूंब भरलेल्या असून गावातील गटारी आल्याने घाणपाणी गटारीतच पडून नाल्या चोक झालेल्या असल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव होत आहे.



# आचारसंहिता उल्लंघनाच्या ४९ तक्रारी

## सी–व्हीजीलवर तक्रार दाखल करण्याचे नागरिकांना आवाहन; ॲप कार्यान्वित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६ अमरावती** – निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. निवडणूक आयोगाने सी व्हिजिल सिटिझन ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारीची दखल घेऊन तातडीने कारवाई केली जाणार आहे. मंगळवारी रात्री ९ वाजेपर्यंत ४९ तक्रारी केल्या आहेत.

आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करू नये, याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळा आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी–व्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाइल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी– व्हिजिलवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते. सीव्हिजिल अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचा तपशील, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ प्रदान करणे आवश्यक आहे.





दैनिक विदर्भ प्रजासत्ताक

यह समाचार पत्र मालक शुभांगी अरुण जोशी, प्रकाशक अरुण जोशी इन्होने मुद्रक हेमंत रामकिशोर जैस्वाल इनके मुद्रणालय श्रद्धा प्रिंटर्स, लक्ष्मी नगर अमरावती, जिल्हा अमरावती महाराष्ट्र यहां छपवाकर कार्यालय श्याम नगर, कॉंग्रेस नगर अमरावती - ४४४६०४ जि. अमरावती महाराष्ट्र से प्रकाशित किया - संपादक शुभांगी अरुण जोशी

Dainik Vidarbha Prajasattk evening news paper owned by Shubhangi Arun Joshi and published by Arun Joshi and printed by Hemant Ramkishor Jaiswal , Shraddha Printers, Lakshmi Nagar , Amravati , district Amravati and published at Shyam Nagar office , Congress Nagar Road Amravati-444606 . Editor : Shubhangi Arun Joshi . Contact : 9607673850 , E-mail : prajasattaknews24@gmail.com




# अमरावती जिल्ह्यातील वरखेड तपासणी नाक्यावर ६ कोटींचे सोने-चांदी पकडले

## निवडणूक विभाग, आयकरकडून चौकशी; पोलिस-एसएसटी पथकाची कारवाई





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६तिवसा –** अमरावती ते नागपूर महामार्गावरील वर्धा अमरावती जिल्ह्याच्या सीमेवर वरखेड तपासणी नाका येथे कार्यरत अमरावती ग्रामीण पोलिस न व 'एसएसटी' पथकाने मंगळवारी ५ नोव्हेंबरला दुपारी नागपूरकडून अमरावतीकडे येणारे एक मिनी मालवाहू तपासले. त्या वेळी या वाहनात ५ कोटी १७ लाखांचे सोने व चांदी आढळले. हे सोने-चांदी व्यापाऱ्यांकडे येत असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. काही बिल पथकाला सादर केले आहे, मात्र चौकशीसाठी मंगळवारी रात्री हा ऐवज तिवसा पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

याबाबत निवडणूक आयकर विभाग सखोल चौकशी करत आहे. विधानसभा निवडणुकीच्या . पार्श्वभूमीवर जिल्हा सीमेवर पोलिस, महसूल विभागाचे तपासणी नाके कार्यरत आहेत.

मंगळवारी दुपारी नागपूरकडून अमरावतीकडे येणारे एक मिनी मालवाहू वाहन येथे कार्यरत पथकाने थांबवले. हे वाहन 'सिक्केल ग्लोबल प्रेशिएस लॉजिस्टिक' कंपनीचे असून ही कंपनी सोने-चांदी वाहतुकीचे काम करते.

दरम्यान, या वाहनाचीतपासणी केली, त्या वेळी आत काही पॅकिंग होते. पॅकिंगमध्ये सोने : वचांदी असल्याचे पथकाला लक्षात आले. हे सोने, चांदी अमरावती शहर, अकोला, खामगाव येथील सुवर्ण व्यावसायिकांना देण्यासाठी आणल्याचे सांगण्यात आले.

### कागदपत्रांची तपासणी आणि सखोल चौकशी सुरू

वरखेड तपासणी नाक्यावर कार्यरत पथकाने वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये सुमारे ५.९७ कोटींचे सोने, चांदी असल्याचे लक्षात आले. या ऐवजाशी निगडित काही कागदपत्र सादर केली आहेत.मात्र सखोल चौकशीसाठी ऐवज ताब्यात घेतला आहे. त्या ऐवजाची आयकर विभाग सखोल चौकशी करत आहे.

**मयूर कळसे,** तहसीलदार तथा सहायक निवडणूक अधिकारी.

# विधानसभा निवडणुकीत १०० टक्के वोटर स्लिप देणार-जिल्हाधिकारी सौरभ कटियार

### बीएलओंची तक्रार आल्यास कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती,**
विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढण्यासाठी मतदारचिठ्ठ्या प्रभावी माध्यम ठरणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व मतदारांना मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत संपूर्ण मतदारांना वोटर स्लिप देण्यात येणार आहे. याबाबत सूचना देण्यात आल्या असून येत्या दोन दिवसात मतदारचिठ्ठीचे वाटप करण्यात येणार आहे. यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, मतदारांना मतदानाआधी मतदान चिठ्ठी मिळाल्यास त्यांना आपले मतदान कोणत्या केंद्रावर आहे, याची माहिती मिळण्यास मदत होते. तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी गेल्यास त्यांना मतदानाची




आवाहनही करणे शक्य आहे. प्रामुख्याने शहरी भागात मतदानाची टक्केवारी कमी असते. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत ज्या भागात कमी मतदान झाले आहे, त्याच भागात प्रभावीपणे जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात यावे. या भागावर लक्ष केंद्रीत केल्यास मतदानाची टक्केवारी वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे. निवडणुकीसाठी दोन आठवड्यांचा कालावधी आहे. या कालावधीत बहुसंख्य मतदारांपर्यंत पोहोचणे शक्य आहे. महानगरपालिका क्षेत्रात मतदार जनजागृतीकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना केली.

मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांसाठी मतदान केंद्रावर सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. प्रामुख्याने पाणी आणि परिसर स्वच्छ राहील, याची दक्षता घेण्यात यावी. मतदान केंद्राबाबत प्रामुख्याने शहरी भागातून तक्रारी जादा प्रमाणात येतात. त्यामुळे याठिकाणी जादा लक्ष देण्यात यावे. प्रामुख्याने लोकसभा निवडणुकीवेळी आलेल्या तक्रारी परत होणार नाही, यासाठी प्रयत्न करावेत. मतदान केंद्रांची नियमितपणे तपासणी करावी. याठिकाणी काही समस्या असल्यास त्या तातडीने दूर कराव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# तिवसा, दर्यापूर मतदारसंघात केवळ नोटासाठी २ ईव्हीएम

### मेळघाटात १, अन्य ७ ठिकाणी प्रत्येकी २ ईव्हीएम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती–** तिवसा मतदारसंघात १६ व दर्यापूरमतदारसंघात १६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून, एका ईव्हीएमवर १६ उमेदवारांचीच नावे असतात. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी केवळ नोटासाठी दोन ईव्हीएम वापराव्या लागणार आहेत. मेळघाटात मात्र १५ उमेदवारचनिवडणुकीच्या रिंगणात असल्यामुळे येथे केवळ एक ईव्हीएम राहणार आहे.

निवडणुकीत मतदान करण्यासाठी एका ईव्हीएममध्ये १६ बटन असतात. उमेदवारांची संख्या यापेक्षा जास्त असेल तर दुसरे मतदान यंत्र वापरले जाते. त्यानुसार मेळघाट वगळता तिवसा, दर्यापूर, अमरावती, बडनेरा, अचलपूर, धामणगाव, मोर्शी या सात मतदारसंघात दोन ईव्हीएम वापरल्याजातील. यात शेवटचे बटन हे नोटाचे राहील. उमेदवारांची एकूण संख्या १६ पेक्षा जास्त असेल तर दुसऱ्या ईव्हीएमचा वापर करावा लागतो. तसेच ज्या ठिकाणी ३२ पेक्षा जास्त उमेदवार असतील, त्या ठिकाणी तीन ईव्हीएम वापरावे लागते, अशी माहिती उपजिल्हाधिकारी तसेच व ईव्हीएम मॅनेजमेंट अधिकारी प्रसेनजित चव्हाण यांनी दिली.



**उमेदवार-ईव्हीएम युनिट**

| विधानसभा | उमेदवार | ईव्हीएम |
|---|---|---|
| अमरावती | २२ | २ |
| अचलपूर | २२ | २ |
| बडनेरा | २६ | २ |
| धामणगाव | २४ | २ |
| मेळघाट | १५ | १ |
| तिवसा | १६ | २ |
| दर्यापूर | १६ | २ |
| मोर्शी | १९ | २ |

# अमरावतीत तिन ठिकाणी स्थिर सर्वेक्षण पथक गठीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती–** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने ३८- अमरावती विधानसभा मतदार संघात असोरिया पेट्रोलपंपजवळ, चांगापुर चौक तसेच अर्जुन नगर चौक आणि एसआरपीएफ कॅम्प या ठिकाणी स्थिर सर्वेक्षण पथकांची स्थापना केलेली आहे. आचारसंहितेचे उल्लंघन होईल अशा वस्तू, बेकायदेशीर रोख किंवा अन्य साहित्य यांचे आवागमन होऊ नये, यादृष्टीने सदर पथकातील अधिकारी, कर्मचारी , येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांवर बारीक लक्ष ठेवत असून प्रत्येक वाहनांची बारकाईने तपासणी करत आहेत. परंतु वाहन तपासणी दरम्यान काही नागरिक हुज्जत घालत असून शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे या पथकात कार्यरत अधिकारी, कर्मचारी हे निवडणूकीविषयक राष्ट्रीय कर्तव्य पार पाडत असून कुणीही त्यांच्याशी हुज्जत घालू नये, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी ३८-अमरावती विधानसभा मतदारसंघ यांनी केले आहे.

# दोन कारची समोरासमोर धडक; चार जण जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**
चांदूर बाजारकडून अमरावतीच्या दिशेने जाणाऱ्या कारचा समोरून येणाऱ्या कारसोबत अपघात झाला. दोन्ही कार एकमेकांवर धडकल्यामुळे हा अपघात झाला आहे. या अपघातात दोन्ही कारमधील चार जण जखमी झाले आहेत. हा अपघात मंगळवारी झाला आहे. अभिष जगन्नाथ राऊत (३७), त्यांची पत्नी व तीन वर्षीय मुलगा (सर्व रा. शिवाजीनगर, चांदूर बाजार) आणि आदिनाथ यादवराव भोगे (२७, रा. करजगाव) हे अपघातात जखमी झाले आहेत. अभिष राऊत त्यांच्या कुटुंबीयांसह अमरावतीवरून चांदूर बाजारच्या दिशेने जात होते. त्याचवेळी आदिनाथ भोगे चांदूर बाजारवरून - अमरावतीकडे कारने येत होते.



यावेळी न अमरावती ते चांदूर बाजार मार्गावरील व बेसखेडा फाट्याजवळ या दोन्ही कारची समोरासमोर धडक झाली. त्यात दोन्ही व कारमधील एअरबॅग उघडल्यामुळे मोठे नुकसान टळले. मात्र दोन्ही कारमधील चार जण जखमी झाले आहेत.

# पीआय लबडेंना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक

**दि.६अमरावती**
**विदर्भ प्रजासत्ताक–** मोर्शी तालुक्यातील दाभेरी गावचे मूळ रहिवासी व सध्या गोंदिया येथे पोलिस निरीक्षक म्हणून कार्यरत दिनेश त्र्यंबकराव लबडे यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झाले आहे. या पुरस्कारासाठी देशभरातून अनेक नामांकन दाखल झाले होते. या वर्षी दिनेश लबडे राज्यातील ३० पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये लबडे यांचा समावेश आहे.प्रत्येक राज्यातील पोलिस आणि अन्य तपास यंत्रणांकडून सर्वोत्कृष्ट तपास वउल्लेखनीय कामगिरीची दखल केंद्रीय गृहमंत्रालयाकडून घेण्यात येते. प्रत्येकराज्यातील पोलिस अधिकाऱ्यांना यामध्ये सहभागी करुन घेण्यात येते. प्राप्त नामांकनामधून सर्वोत्कृष्ट गुन्हे तपासासाठी केंद्रीय दक्षता पदक पुरस्कार जाहीर करण्यात येतो. पोलिस निरीक्षक दिनेश लबडे यांनीनागपूर येथील राज पांडे या १५ वर्षीयबालकाच्या खून प्रकरणाचा उत्कृष्ट तपास करून आरोपी सूरज रामभूज साहू याच्याविरुद्ध सर्व पुरावे कोर्टात सादर केले.त्याआधारे आरोपीला दुहेरी जन्मठेपेची शिक्षा २२ जून २०२३ ला सुनावण्यात आली होती.याची दखल केंद्रीय गृहमंत्रालयाने घेतली.

# सौदार्हपूर्ण वातावरणात निवडणूक पार पाडावी निवडणूक निरीक्षकांच्या सूचना

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.६ अमरावती –** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवार अंतिम झालेले आहेत. त्यांना चिन्ह वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे आजपासून प्रचाराला सुरूवात होणार आहे. उमेदवारांना सहकार्य करण्याची भूमिका प्रशासनाने ठेवावी, तसेच उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करून ही निवडणूक सौदार्हपूर्ण वातावरणात पार पाडावी, अशा सूचना निवडणूक निरीक्षकांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात विधानसभा निवडणुकीसाठी आलेल्या निरीक्षकांनी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्यासह सामान्य निवडणूक निरीक्षक श्यामलाल पुनिया, बिहान चंद्र चौधरी, पोलिस निरीक्षक बत्तुला गंगाधर, खर्च निरीक्षक वेंकन्ना तेजावत, डॉ. उमा माहेश्वरी आदी उपस्थित होते.निवडणूक निरीक्षक यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांना विविध सूचना दिल्या. उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात आल्याने आजपासून



प्रचार सुरू होणार आहे. प्रचारासाठी लागणाऱ्या सर्व परवानगी एक खिडकीच्या माध्यमातून देण्यात येत आहे. तातडीने सर्व परवानगी मिळण्यासाठी यंत्रणा उभारण्यात आली आहे. उमेदवारांच्या खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी फिरते आणि स्थिर पथक निर्माण करण्यात आले आहे. ही पथक कार्यरत असल्याची खात्री करण्यात यावी. त्यांच्यामार्फत जप्तीच्या कारवाई करण्यात याव्यात. तसेच याठिकाणीचे कॅमेरे आणि वीज पुरवठा सुरळीत सुरू राहतील, याची दक्षता घेण्यात यावी, अशा सूचना दिल्या. उमेदवारांनी त्यांचा प्रचार करताना आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. उमेदवारांनी वैयक्तिक टिका-टिप्पणी टाळावी. तक्रार करण्याआधी सत्यता पडताळून पाहावी. याबाबत राजकीय पक्षांनी निवडणूक प्रतिनिधींनाही सूचना द्याव्यात. जिल्ह्यात कुठेही कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार याची दक्षता सर्वांनी घ्यावी. नागरिकांच्या तक्रारी किंवा समस्या आल्यास त्याबाबत तातडीने कार्यवाही करून त्या निराकरणासाठी प्रयत्न करावेत. उमेदवारांच्या खर्चाबाबत योग्य कार्यवाही करण्यात यावी. खर्च पथकांनी दर्शविलेला खर्च आणि उमेदवारांचा खर्च यांची जुळवणी होणे आवश्यक आहे. निवडणूका पारदर्शक आणि न्याय वातावरणात होण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया पार पाडावी. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. उमेदवारांच्या मतदान प्रतिनिधींना तातडीने ओळखपत्र देण्यात यावे. त्यांना मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेची संपूर्ण माहिती देण्यात यावी. तसेच उमेदवारांनी काय करावे आणि काय करू नये याबाबतची माहिती देण्याच्या सूचनाही निरीक्षकांनी यावेळी दिल्या.

### उमेदवारांच्या मतदान प्रतिनिधींना ओळख पत्रे देण्याची सूचना

निवडणूक पारदर्शक आणि न्याय वातावरणात होण्यासाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया पार पाडावी. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. उमेदवारांच्या मतदान प्रतिनिधींना तातडीने ओळखपत्र देण्यात यावे. त्यांना मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेची संपूर्ण माहिती देण्यात यावी. तसेच उमेदवारांनी काय करावे आणि काय करू नये, याबाबतची माहिती देण्याच्या सूचनाही निरीक्षकांनी या वेळी दिल्या.

# राजवीर जनहित संघटनेचा महायुतीच्या उमेदवार सौ.सुलभाताई खोडके यांना जाहीर पाठींबा..

**निवडणुकीत प्रचार करून विजयी करण्याचा संघटनेचा निर्धार**

## सुलभाताईमुळेच अल्पसंख्यांक बहुल भागाचा बदलला चेहरा-मोहरा -रम्मु पत्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती-** अमरावती विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या अधिकृत उमेदवार आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांना राजवीर जनहित संघटनेने जाहीर पाठींबा दिला आहे. स्थानिक युसूफ पॅलेस येथे झालेल्या भव्य कार्यक्रमात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रहमत खान उर्फ रम्मु पत्रकार यांनी पाठिंब्याचे पत्र देवून अमरावतीमध्ये महायुतीच्या उमेदवार सौ.सुलभाताई खोडके यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार केला आहे. गेल्या पाच वर्षात आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या प्रयत्नाने अमरावतीच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध झाल्याने अमरावतीचा चेहरा-मोहरा बदलला आहे. रस्ते , नालींचे बांधकाम, चेनलिंग फेन्सिंग, सौंदर्यीकरण , सुसज्ज अभ्यासिका, अशी जी विकासकामे शहराच्या सर्वसाधारण भागात झाली, तीच विकासकामे शहराच्या अल्पसंख्यांक बहुल भागातही मार्गी लागली आहे. शहराच्या आरोग्य , शिक्षण , क्रीडा सुविधा, उद्योग व दळणवळण आदी मानवविकासाशी संबंधित क्षेत्राचा झपाट्याने विकास झाल्याने अमरावतीकर जनतेला विकासाचे पर्व अनुभवास मिळत आहे.

आगामी काळातही विकासाची शृंखला अबाधित राहण्यासाठी तसेच विकासाला गती देण्यासाठी अमरावतीमध्ये सुलभाताई खोडके यांनाच आमदार म्हणून निवडून द्यायचे आहे.

म्हणूनच राजवीर जनहित संघटना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून त्यांचा प्रचार व निवडून आणण्यासाठी दिवस-रात्र मेहनत करणार असल्याचा विश्वास संघटनेचे



संस्थापक अध्यक्ष रहमत खान उर्फ रम्मु पत्रकार यांनी व्यक्त केला.

सरकारमध्ये असतांना उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी अल्पसंख्यांक विकास योजनांना गती देण्यासाठी जे काही निर्णय घेतले, अनुषंगाने अमरावतीमध्ये सुद्धा अल्पसंख्यांक नागरी बहुल क्षेत्रात विकास कार्यक्रम राबविण्यावर आपण सातत्यपूर्ण भर दिला आहे.

मनपा शाळांना दर्जावाढ व चांगल्या सुविधा, आरोग्य सुविधा, पायाभूत सुविधा अशा विकासाचा कृती कार्यक्रम राबविण्यात आला. यामध्ये सर्व स्नेहीजन व नागरिकांची मोलाची साथ लाभली. येत्या २० नोव्हेंबर २०२४ ला होणाऱ्या निवडणूकीत महायुतीची उमेदवार म्ह्णून घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवीत आहे.

आगामी काळात अल्पसंख्याक विकास योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी अमरावती विधानसभा निवडणुकीत विजयी करण्याचे आवाहन आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी केले. यावेळी उपस्थित शेकडो महिला भगिनी व बांधवानी हात उंचावित घड्याळ या चिन्हालाच आपली साथ असल्याचा विश्वास दर्शविला.

# भाजपकडून बंडखोरांवर मोठी कारवाई, राज्यातील ४० नेत्यांची पक्षातून हकालपट्टी

## अमरावती मधील जगदीश गुप्तांचाही समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६नागपूर-** विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या तीनही पक्षांमध्ये सर्वाधिक बंडखोरी दिसून आली आहे. त्यातही भाजपामध्ये बंडखोरांची संख्या अधिक आहे. दोनच दिवसांपूर्वी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बंडखोरांवर कारवाई करण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार आता राज्याच्या ३७ विधानसभा मतदारसंघातील ४० बंडखोरांवर कारवाई करण्यात आली आहे. पक्षाचा आदेश डावलून शिस्तभंग केल्याबद्दल या नेत्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. भाजपाच्या कारवाईनंतर आता एकनाथ शिंदे आणि अजित पवार त्यांच्या पक्षातील बंडखोरावर काय कारवाई करणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



राज्यभरात भाजपा नेत्यांनी अनेकठिकाणी बंडखोरी केली असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होत होती. या नेत्यांवर कारवाई न झाल्यास महायुतीमध्ये चुकीच संदेश जाईल, अशी भीती वाटत असताना आता कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.विशेष म्हणजे अमरावती मधून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले भाजपाचे मजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांच्यावर सुद्धा पक्षाने निलंबनाची कारवाई केली आहे.



४ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत होती. भाजपाने अनेक बंडखोरांची समजूत घालून अर्ज मागे घेण्याचा प्रयत्न केला. बोरीवली विधानसभा मतदारसंघात बंडखोरी केलेल्या गोपाळ शेट्टींनी अर्ज मागे घ्यावा, यासाठी समजूत घालण्यात आली. त्यानंतर गोपाळ शेट्टी यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. मात्र अनेक मतदारसंघातील बंडखोर आपल्या भूमिकेवर ठाम राहिले.

२९ ऑक्टोबर रोजी जेव्हा उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. तोपर्यंत महायुतीमधील ५० नेत्यांनी बंडाचे निशाण फडकवले होते. त्यापैकी ३६ उमेदवार हे महायुतीचे होते. यातही भाजपाचे सर्वाधिक १९ उमेदवार आहेत, तर त्यापाठोपाठ शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे १६ उमेदवार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा केवळ एकच बंडखोर आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मागच्या आठवड्यात दिल्ली येथे झालेल्या बैठकीत महायुतीमधील बंडखोरांची समजूत काढण्याची सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना दिली होती.

### महायुतीकडून ३६ बंडखोर

भाजपा विरुद्ध शिवसेना, ९ मतदारसंघ – ऐरोली, अंधेरी पूर्व, पाचोरा, बेलापूर, फुलंब्री, कल्याण पूर्व, विक्रमगड, सोलापूर शहर

शिवसेना विरुद्ध भाजपा, १० मतदारसंघ – मेहकर, बुलढाणा, सावंतवाडी, जालना, पैठण, घनसावंगी, अलिबाग, कर्जत, मिरा-भाईंदर

राष्ट्रवादी विरुद्ध शिवेसना, ७ मतदारसंघ – पाथरी, बीड, वाई, अनुशक्तीनगर, देवळाली, दिंडोरी आणि खेड आळंदी

राष्ट्रवादी विरुद्ध भाजपा, ९ मतदारसंघ – अहेरी, अमळनेर, अमरावती, पाथरी, शहापूर, जुन्नर, उदगीर, कळवण, आळंदी

शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी, १ मतदारसंघ – नांदगाव (नाशिक)

# वृत्त वाहिनीच्या कार्यक्रमात राडा; भाजप नेत्यांना धक्काबुक्की, पोलीस ठाण्यात शेकडोंचा जमाव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६वर्धा : –** वर्धा पोलीस ठाण्यात शेकडोंचा जमाव पाहून शहरात खळबळ उडाली आहे. आज एका प्रसिद्ध वृत्त वाहिनीतर्फे निवडणूक कार्यक्रम न्यू इंग्लिश शाळेच्या पटांगणात सायंकाळी आयोजित करण्यात आला होता. त्या चर्चेत भाजप नेते श्रीधर देशमुख यांनी काँग्रेस उमेदवार शेखर शेंडे यांच्यावर टीका केली. शेंडे यांचे आजोबा अनेक वर्ष आमदार, वडील ३० वर्ष आमदार व काही काळ मंत्री, आता पुत्र शेखर यांना सतत पडूनही परत चौथ्यांदा तिकीट दिले. ही घराणेशाही जनता खपवून घेणार नाही, असे भाष्य केले.

मात्र, कार्यक्रम आटोपल्यावर शेखर शेंडे यांचे बंधू रवी शेंडे व त्यांचे मित्र बबलू बिर्याणीवाला हे माझ्यावर धावून गेले व



मारहाण केली, असे श्रीधर देशमुख यांनी नमूद केले. मला मारहाण होत असल्याचे पाहून पत्नी व माजी नगरसेवक श्रेया देशमुख मधात पडली. तेव्हा तिला पण या लोकांनी धक्काबुक्की केली, असा आरोप श्रीधर देशमुख यांनी केला. सध्या मी व पत्नी श्रेया तक्रार देत असल्याचे ते म्हणाले.

मेदवार शेखर शेंडे म्हणाले, मी एका गावात प्रचार कार्यात आहे. हा भाजपचा आम्हास बदनाम करण्याचा डाव आहे. आता ते रविदादावरसुद्धा गलिच्छ आरोप करत असतील तर मग जनता ठरवेल. हा प्रकार कळताच आमदार डॉ. पंकज भोयर, जिल्हाध्यक्ष गफाट व अन्य भाजप नेते वर्धा पोलीस ठाण्यात पोहोचले. आमदार भोयर म्हणाले, हा प्रकार अत्यंत निषेधार्ह असून विरोधक काय स्तर गाठत आहे हे यातून दिसून येते. श्रीधर देशमुख हे एका विकाराने त्रस्त असताना त्यांच्यावर झालेला हल्ला म्हणजे पातळी सोडून वागणे नव्हे का, असा प्रश्न भोयर यांनी केला.

### 'बनावट आरोप, भाजपचे षडयंत्र'

रवी शेंडे म्हणाले, हा खोटा आरोप आहे. त्यांनी माझ्या कुटुंबावार आरोप केले. त्यामुळे मी व्यथित होऊन आजोबा व वडिलांनी केलेल्या विकास कामांचा पाढा वाचला. त्यानंतर निघून गेलो. पुढे काय झाले ते मला माहीत नाही. आरोप होत असल्याने मीसुद्धा पोलीस तक्रार केली आहे. या बनावट आरोपाची चौकशी करावी व दोषींवर कारवाई करावी. हे भाजपने रचलेले षडयंत्र आहे, असे शेंडे म्हणाले.

## बच्चूभाऊ धावले मदतीला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आमदार बच्चू कडू हे परिवर्तन महाशक्तीच्या उमेदवारांच्या प्रचार दौऱ्यावर असताना मार्गात त्यांना अपघात झाल्याचे दिसताच त्यांनी प्रचारदौरा थांबवून प्रथम जखमींना हलविण्याची व्यवस्था केली.आमदार बच्चू कडू प्रचार दौऱ्यावर असताना मुर्तिजापूर-पिंजर मार्गावर अपघात झाल्याचे त्यांना आढळले. प्रचार दौरा मागे ठेऊन आ. बच्चु कडु यांनी अपघातातील जखमींना दवाखान्यात पोहचविले. डॉक्टरांसोबत अपघातग्रस्ताच्या तब्येतीची विचारपूस करुन पुढील दौरा सुरु केला.



# विदर्भातील ३२ मतदारसंघात बंडखोरांनी थोपटले दंड; स्वपक्षीयांचा होईल कमीअधिक त्रास

## निम्म्या जागांवर आघाडी, महायुतीच्या उमेदवारांपुढे तगडे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती –** विधानसभा निवडणुकीत अर्ज मागे घेण्याचा शेवटच्या क्षणापर्यंत अनेक मतदारसंघांमधील बंडाळी मोडून काढण्यात महायुती व महाविकास आघाडीच्या नेत्यांना यश आले असले तरी तांत्रिकदृष्ट्या विदर्भातील ६२ पैकी ३२ मतदारसंघात बंडखोरांनी अर्ज कायम ठेवले आहेत. परिणामी, महाविकास आघाडीच्या २२ उमेदवारांना तर महायुतीच्या २० उमेदवारांना स्वपक्षीयांचा कमीअधिक त्रास होईल, अशी चिन्हे आहेत. १५ जागांवर मात्र आघाडी व महायुतीच्या उमेदवारांपुढे बंडखोरांचे तगडे आव्हान राहील. बंडखोरांचा राग शांत करण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडून विशेष दूत गेल्या दोन दिवसांपासून कार्यरत होते. त्यामुळे विदर्भात बहुतेक ठिकाणी बंडोबांचे 'थंडोबा' झाल्याची चित्र आहे. उमेदवारी नाकारलेल्या अनेक माजी आमदारांनी अर्ज मागे घेतलेत, मात्र तरीही पक्षातील महत्त्वाकांक्षी नेत्यांनी श्रेष्ठींचे न ऐकता उमेदवारी कायम ठेवत बंड पुकारले आहे. बंडखोरांनी दंड थोपटलेल्या मतदारसंघांमध्ये नागपूर मध्य, नागपूर पूर्व, रामटेक, काटोल, सावनेर, उमरेड, कामठी, अहेरी, आरमोरी, बल्लारपूर, वरोरा, सकोली, तुमसर, राळेगाव, वणी, उमरखेड, अमरावती, बडनेरा, मोर्शी, अचलपूर, मेळघाट, वर्धा, हिंगणघाट, बुलढाणा, सिंदखेड राजा, रिसोड, वाशीम, अकोला पश्चिम, बाळापूर, आकोटचा समावेश आहे

### मोर्शी, सिंदखेडराजात 'सांगली पॅटर्न'

लोकसभेतील मैत्रीपूर्ण लढतीचा 'सांगली पॅटर्न' या वेळी



अमरावती जिल्ह्यातील मोर्शी व बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा मतदारसंघात पाहायला मिळत आहे. मोर्शीमध्ये महायुतीकडून अजित पवार गटाने देवेंद्र भुयार यांना तर भाजपने उमेश यावलकर यांना उमेदवारी दिली आहे. सिंदखेडराजामध्ये शिंदेसेनेचे माजी आमदार शशिकांत खेडेकर आणि अजित पवार गटाचे मनोज कायंदे हे अधिकृत उमेदवार म्हणून रिंगणात आहेत. महायुतीत या दोन्ही मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत होईल.

### १५ मतदारसंघात रंगणार चुरस

नागपूर मध्य, रामटेक, अहेरी, आरमोरी, बल्लारपूर, तुमसर, उमरखेड, अमरावती, बडनेरा, मोर्शी, वर्धा, हिंगणघाट, सिंदखेड राजा, रिसोड, अकोला पश्चिम या १५ मतदारसंघांमध्ये मात्र बंडखोरांचे तगडे आव्हान आहे. भाजप व काँग्रेस या दोन्ही राष्ट्रीय पक्षांनी हलबा समाजाला उमेदवारी न दिल्याने नाराजांनी एकत्र येऊन रमेश पुणेकर यांना नागपूर मध्य मतदारसंघात उतरविले आहे. रामटेकमध्ये काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मुळक यांनी उद्धवसेनेचे विशाल बरबटे यांच्या विरोधात उमेदवारी कायम ठेवली आहे. अहेरीत मतदारसंघात भाजपचे अंबरीशराव आत्राम यांनी महायुती धर्म नाकारून धर्मरावबाबा आत्राम यांच्याविरोधात बंडाचा झेंडा उंचावला आहे. आरमोरी मतदारसंघात माजी आमदार आनंदराव गेडाम, तुमसरमध्ये माजी आमदार सेवक वाघाये, उमरखेडमध्ये माजी आमदार राजेंद्र नजरधने, माजी आमदार विजय खडसे, अमरावतीत माजी आमदार जगदीश गुप्ता, रिसोडमध्ये माजी आमदार अनंतराव देशमुख, हिंगणघाटमध्ये माजी आमदार प्रा. राजू तिमांडे यांचे अधिकृत उमेदवारांपुढे आव्हान आहे. ज्येष्ठ नेते रणजित देशमुख यांचे चिरंजीव अमोल यांनी सावनेरमध्ये, नागपूर पूर्वमध्ये आभा पांडे, बडनेऱ्यात प्रीती संजय बंड यांची बंडखोरी कायम आहे. तिथे आमदार रवी राणा यांच्यापुढे भाजपचे तुषार भारतीय यांनी शड्डू ठोकला आहे. मोर्शीत काँग्रेसचे विक्रम ठाकरे यांनी शरद पवार गटाचे गिरीश कराळे यांच्या विरोधात अर्ज कायम ठेवला आहे. बल्लारपूरमध्ये काँग्रेसच्या डॉ. अभिलाषा गावतुरे, अकोला पश्चिममध्ये भाजपचे हरिश आलिमचंदानी व उद्धवसेनेचे राजेश मिश्रा अपक्ष लढतीत आहेत. वर्धा मतदारसंघात काँग्रेस उमेदवार शेखर शेंडे यांच्यापुढे डॉ. सचिन पावडे यांचे आव्हान असेल.

# 'चला मुंब्र्याला शिवरायांचं मंदिर उभारु' देवेंद्र फडणवीस यांचे उद्धव ठाकरेंना चॅलेंज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६कोल्हापूर**

महायुतीच्या प्रमुख नेत्यांची पहिली संयुक्त प्रचारसभा कोल्हापूरमध्ये झाली. या प्रचारसभेत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यांनी कोल्हापूर जिल्ह्यात झालेल्या सभेत सत्तेवर आल्यास राज्यात सगळीकडं शिवरायांचं मंदिर उभारणार अशी घोषणा केली. तो संदर्भ देत फडणवीस यांनी मुंब्र्यात शिवरायांचं मंदिर उभारा असं चॅलेंज दिलं

आज उद्धवजी इथं आले होते. ते भाषणात म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांचा इंग्रजांवर राग होता म्हणून त्यांनी सुरत लुटली. इंग्रज होतेच कुठं, तुम्हाला आता



औरंगजेबांचं नाव घ्यायला लाज वाटू लागली, इतकं लांगूलचालन ? अशी टीका फडणवीस यांनी केली. उद्धवजी तुम्ही म्हणता सगळीकडं शिवरायांचं मंदिर उभारणार, चला तर मुंब्र्याला शिवरायांचं मंदिर उभारु, तुम्हाला मदत करायला आम्ही देखील तयार आहोत. आमचे नेते मुख्यमंत्री एकनाथ राव शिंदे यांच्या नेतृत्त्वात पहिलं मंदिर तिथं उभारु आणि शिवरायांना वंदन करु, असं आव्हान त्यांनी उद्धव ठाकरे यांना दिलं.

अलिकडच्या काळात गुजरातला पेपरमध्ये जाहिरात देण्याची गरज नाही. महाविकास आघाडीचे नेतेच गुजरात कसे पुढे आहे ते सांगतात. देशातील एकूण गुंतवणुकीपैकी ५२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आहे. महाविकास आघाडीचे नेते रोज खोटं बोलतायत. तुमच्यामुळे या देशाच्या उद्योगपतींना वाटू लागलंय आता गुजरातमध्ये जावं. तुम्ही एकप्रकारे गुजरातचं प्रमोशन करताय हा महाराष्ट्र द्रोह नाही का? असा सवाल त्यांनी विचारला. देशात रोजगारातही पहिला क्रमांक महाराष्ट्राचाच असेल, असा दावा त्यांनी केला.

लाडकी बहीण, महिलांना ५० टक्के एसटी प्रवासात सूट, लखपती दीदी या महिलांसाठी योजना आम्ही लागू केल्या. आमच्या बहिणींना आम्ही सुरक्षा देणार आहोत. यांचा एक उमेदवार आमच्या लाडक्या बहिणीला म्हणतो इथं माल आलाय शरम वाटत नाही. यांचा दुसरा उमेदवार महिलांना बकरी म्हणतो, कुठं गेले संस्कार, महिलांना सुरक्षा तुमच्या वाचाळवीरांपासून केलं पाहिजे. महिलांना सुरक्षा देण्याचं काम हेच सरकार करणार आहे. महिलांबाबत गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा करण्याचं काम हेच सरकार करतंय आणि करणार आहे, असं फडणवीस म्हणाले.

शेतकऱ्यांना वीमा, मोफत वीज देण्याचं काम केलं. आम्ही सोलार वीज तयार करण्याचं काम करतोय. त्यामुळे पुढील काळत २४ तास मोफत वीज देण्याचं काम आमचं सरकार करतंय. वारंवार कोल्हापूर आणि सांगलीला पूर येत होता. त्यावेळी पूराचं पाणी दुष्काळात पाणी वळवण्याचं काम आम्ही केलंय. प्रत्येकाच्या जीवनात परिवर्तन करण्याचं काम आम्ही करतोय त्याला तुमचा आशीर्वाद हवाय.

कॉंग्रेसचे नेते लाडकी बहीण योजनेच्या विरोधात हायकोर्टात गेले आहेत. हे निवडून आले तर सर्व योजना बंद करतील. यांच्या राज्यात एकही घोषणा पूर्ण झाली नाही. भाजपाच्या राज्यात घोषणा केलेल्या सर्व योजना सुरु आहेत, असं फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

# विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी प्रत्येक शाळेत 'सिक रूम' बंधनकारक

## शालेय शिक्षण विभागाचा निर्णय : गरजेनुसार डॉक्टर 'ऑन कॉल' सुविधा उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**



शाळेत प्रथमोपचाराकरिता आजारी विद्यार्थ्यांना तातडीची वैद्यकीय व्यवस्था करण्यासाठी लागणाऱ्या सोयीसुविधा उपलब्ध कराव्यात. तसेच शाळांत संबंधित प्राधिकरणांच्या मानकांनुसार आजारी विद्यार्थ्यांना तातडीची वैद्यकीय व्यवस्था करण्यासाठी फर्स्ट एड किंवा सिक रूम उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांना दिले आहेत.

राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व शाळांमध्ये दररोज किमान सहा ते सात तास विद्यार्थी उपस्थित असतात. या कालावधीत काही विद्यार्थ्यांना तातडीच्या वैद्यकीय उपचारांची गरज भासू शकते. अशा वेळी शाळेच्या नजीक वैद्यकीय सुविधा असेलच असे नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत शाळा प्रशासनाने समयसूचकता दाखवून तातडीने आवश्यक कार्यवाही केल्यास विद्यार्थ्याला वैद्यकीय मदत मिळून अप्रिय घटना टाळता येतील. विद्यार्थ्यांना तत्काळ वैद्यकीय मदत पुरविण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी सहकाऱ्यांनी त्याबाबतीत नेहमी सजग असणे आवश्यक आहे.

### तपासणी शिबिरात द्यावे प्रशिक्षण

शिबिरामध्ये कृत्रिम श्वासोच्छवास, कृत्रिम वायुजिवन व इतर तातडीचे प्रथमोपचार देण्याबाबत त्यांना प्रशिक्षिण देण्यात यावे. शाळेनजीक उपलब्ध असलेल्या शासकीय रुग्णालये, शासकीय आरोग्य केंद्र, खासगी दवाखाने आणि शासकीय व सार्वजनिक रुग्णवाहिकांचे संपर्क क्रमांक ठळक अक्षरात दर्शनी भागात लावण्यात यावेत व त्यांच्याशी समन्वय ठेवण्यात यावा. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी शाळेत आवश्यकतेनुसार समन्वयक नेमण्यात यावेत. आपत्कालीन परिस्थितीत सदर समन्वयकाने रुग्णास तत्काळ उपचार मिळण्याच्या दृष्टीने रुग्णालयांशी संपर्क साधावा व आजारी विद्यार्थ्यांस रुग्णालयात भरती करण्यात मदत करावी. शाळेने नजीकच्या दवाखान्यांशी तसेच जवळपासच्या डॉक्टरांशी ऑन कॉल सेवा उपलब्ध करून देण्याबाबत सामंजस्य करार करावेत व विद्यार्थ्यांना गरजेनुसार डॉक्टर ऑन कॉल सुविधा उपलब्ध द्यावी, असे निर्देशदेखील देण्यात आले.

### समुपदेशक नेमा

आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेण्याची गरज भासल्यास शाळेकडे वाहनाची व्यवस्था असावी. विद्यार्थ्यांकरिता शाळास्तरावर तणावमुक्तीसाठी कार्यशाळा आणि इतर उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी समुपदेशकाची व्यवस्था करावी, या सूचनांच्या अंमलबजावणीबाबत संचालक, उपसंचालकांनी मासिक आढावा घ्यावा व आवश्यकतेनुसार शिक्षणाधिकारी व इतर संबंधित अधिकाऱ्यांना मागदर्शन करणे देखील बंधनकारक आहे.

# मतदानाचा दिवा तेवत ठेवा अंबादेवी परीसरात मतदान जनजागृती

## मनपा व जिल्हा स्वीप कक्षाचा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

स्वीप कक्ष मनपा व स्वीप कक्ष जि.प.यांच्या संयुक्त विद्यमाने अंबादेवी परीसरात मंगळवारला सायंकाळी मतदान जनजागृती कार्यक्रमातंर्गत मतदानाचा दावा तेवत ठेवा असा संदेश देत दिवे लावून आणि मतदानाची शपथ देऊन करण्यात आली.यावेळी शेकडो नागरीक भक्त उपस्थित होते. महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रीक निवडणूक येत्या २०नोव्हेंबरला होत आहे.मतदानाचा टक्का वाढावा म्हणुन जिल्हा प्रशासन व मनपा प्रशासन विविध उपक्रम राबवित आहे.याकरीता स्वीप कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.विविध परीसरात आणि नाविण्यपूर्ण उपक्रम राबवित आहे.याचाच एक भाग म्हणुन नागरीकांच्या गर्दीच्या ठीकाणी मतदान जनजागृती करण्यात येत आहे या उपक्रमाला मतदारांचा चांगला प्रतिसाध मिळत आहे. या उपक्रमाची सुरुवात अंबादेवी संस्थानचे विशस्त विलासदादा मराठे,मनपा शिक्षणाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम,ॲड.पांडे, ज्ञानेश्वर राव घाटे, हेमंतकुमार यावले, प्रवीण ठाकरे, योगेश पखाले, पंकज सपकाळ,योगेश राणे, संजय बेलसरे, गणेश सावंत,उज्वल जाधव,सुमेश वानखडे, माहुलकर दादा,सरोदे भाऊ,राजेश सावरकर,आदित्य तायडे यांच्या हस्ते दिप प्रज्वलित करण्यात आले.तसेचजिल्हा स्टेडियम, गांधी चौक, विलास नगर परीसरात मतदान जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला. शहरातील विविध खेळाची मैदाने, चौक अशा ठिकाणी नवीन तरुण मतदार यांनी मोठ्या प्रमाणावर मतदान करावे याकरिता करून मतदारांना एकत्र आणून स्वीप नोडल अधिकारी व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र,मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप विभागाच्या वतीने मतदानाची शपथ दिली जात आहे. तसेच मतदान करणे का आवश्यक आहे याबद्दल माहिती देऊन मतदानाचे महत्त्व या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न प्रशासन करीत आहे.

# गुन्ह्यांची माहिती प्रसिद्ध करणे उमेदवारांना बंधनकारक

## शपथपत्रातील नमुन्यात करावी लागेल प्रसिद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांवर दाखल गुन्ह्यांची माहिती निवडणूक काळात तीनवेळा प्रसिद्ध करणे उमेदवारांना बंधनकारक करण्यात आले आहे. त्यांना उमेदवारी देणाऱ्या राजकीय पक्षांनाही त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर ही माहिती प्रसिद्ध करावी लागणार आहे.

उमेदवारांवर गुन्हे कोणत्या स्वरूपाचे आहेत व त्यांची सद्यःस्थिती काय, हे माहीत असणे हा मतदारांचा अधिकार आहे. त्यामुळे उमेदवारांना, तसेच ते ज्या पक्षाकडून उमेदवार आहेत, त्या पक्षांना संबंधित उमेदवाराच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची प्रसिद्धी करावी लागणार आहे. निवडणूक आयोगाने विहित केलेल्या शपथपत्रातील नमुन्यात प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांची परिपूर्ण माहिती ठळकपणे देणे उमेदवारांवर बंधनकारक आहे. करण्यात आले

उमेदवार आणि संबंधित पक्षांनाही प्रलंबित गुन्हेगारी खटल्यांच्या माहितीला वर्तमानपत्र आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाद्वारे प्रसिद्धी द्यावी लागणार आहे. माहिती ठळकपणे देणे उमेदवारांवर बंधनकारक करण्यातआले




आहे. विशेष म्हणजे, ज्या उमेदवारांवर गुन्हे दाखल आहे आणि त्यांनी याबाबत माहिती दडवली किंवा प्रसिद्धी केली नाही. तर त्या उमेदवारांवर निवडणूक आयोग कडक कारवाई करणार आहे.

**तीन वेळा करावी लागेल प्रसिद्ध**

निवडणूक कालावधीत तीनवेळा ही माहिती प्रसिद्धी करावी लागणार आहे. प्रथम प्रसिद्धी उमेदवारी अर्ज–माघारीच्या तारखेपासून पहिल्या चार दिवसांत, दुसरी प्रसिद्धी यापुढील पाच ते ते आठ दिवसांत करणे आवश्यक आहे. तिसरी प्रसिद्धी नवव्या दिवसा–पासून प्रचाराच्या अखेरच्या दिवसापर्यंत करता येणार आहे.

# बडनेरा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रवी राणा यांच्या पदयात्रेला प्रचंड प्रतिसाद

## लाडक्या बहीणी ओवाळणी घालून देत आहे आशीर्वाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६बडनेरा**



भाजप,शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, रिपाई आठवले, पिरिपा कवाडे, लहूजी शक्ती सेना, शेतकरी संघटना महायुतीचे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांच्या प्रचाराचा झंझावात सुरू आहे. संपूर्ण बडनेरा विधानसभा मतदारसंघात त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. संपूर्ण बडनेरा मतदारसंघात मातृ–पितृ शक्ती आणि युवा वर्ग यांच्या पुढाकाराने जागोजागी बैठकीचा धडाका सुरू आहे. मंगळवारी सकाळी रवी राणा यांच्या भव्य पदयात्रेला महादेवखोरी उड्डाण पूल पासून सुरुवात झाली. पदयात्रे परिसरातील लोक, युवा वर्ग स्वयं स्फूर्तीने सहभागी झाले. यावेळी आपला मुलगा आपल्या दारी या जनसंपर्क यात्रेत रवी राणा यांचा घरोघरी ओवाळणी घालून लाडक्या बहीणी आशीर्वाद देत आहे. सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सतत १५ ते १६ किलोमीटर पदयात्रेत फिरून रवी राणा यांनी माय बाप जनतेचा आशीर्वाद घेतला.रवी राणा यांनी परिसरातील श्री हनुमान मंदिर येथे दर्शन करुन प्रिया कॉलोनी पर्यंत संपूर्ण परिसर पिंजून काढला. यावेळी परिसरातील सर्व वयोवृध्द, माय बाप जनता आणि युवा वर्ग सोबतच लहान मुलांमध्ये देखील रवी राणा यांच्या बद्दल विशेष आपुलकी दिसत आहे. आलारे आला रवी राणा चार पाणा आला, अश्या जाहीर घोषणेने परिसर दणाणून सोडला आहे.

रवी राणा यांच्या सतत जनसंपर्कातील आपुलकीने लोकांच्या मनात वेगळेच स्थान निर्माण केले आहे. हेच प्रमुख कारण आहे की, रवी राणा आल्यावर त्यांचे मनापासून स्वागत करण्यात येत आहे. प्रत्येक क्षेत्रात हजारो नागरिक, लाडक्या बहीणी त्यांच्या प्रचारासाठी सरसावले आहेत. या भागात रवी राणा यांनी पदयात्रा करून माय बाप जनतेचा आशीर्वाद घेत आहे. यावेळी हजारो नागरिक व लाडक्या बहीणी यांनी रवी राणा यांच्या विजयाचा निर्धार कर पाणा निवडणूक चिन्हावर पुन्हा एकदा आपली मोहोर लावण्याचे जाहीर केले.

# उद्धव ठाकरेंच्या महासभेने पालटणार बडनेराचे चित्र

## मविआ उमेदवार सुनील खराटे यांना मिळणार बळ : शिवसैनिकांमध्ये संचारला उत्साह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

बडनेरा विधानसभा मतदार संघात सध्या त्रिकोणी लढतीचे चित्र निर्माण झाले आहे.शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची विधानसभा निवडणुकीतील पहिलीच सभा आज (दि.७ नोव्हें) बडनेरा मतदार संघात होणार असून या सभेने मात्र बडनेरा मतदार संघाचे चित्र पालटणार आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील खराटे यांचे हात या सभेने बळकट होणार असून उद्धव ठाकरे यांच्या या सभेमुळे बडनेरा मतदार संघातील शिवसैनिकांमध्ये उत्साह संचारला आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि महाराष्ट्राची मुलुख मैदानी तोफ उद्धव ठाकरे आज ७ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता जुनी वस्ती



बडनेरा येथील आठवडी बाजार प्रांगण येथे विशाल जाहीर सभेद्वारा शिवसैनिक आणि मतदारांना साद घालणार आहे. या सभेच्या माध्यमातून उद्धव ठाकरे हे विदर्भातील प्रचाराचा शुभारंभ करणार आहेत.बडनेरा मतदार संघातील महा विकास आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे यांच्या प्रचारार्थ बडनेरा जुनीवस्ती आठवडी बाजार प्रांगणात आयोजित जाहीर सभेला ते संबोधित करणार आहे.

या सभेत उद्धव ठाकरे यांची तोफ धडाडणार असून ते जाहीर सभेतून कोणाला लक्ष करतात आणि कुणाचा समाचार घेतात याकडे संपूर्ण जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे. तसेच ते सुनील खराटे यांना निवडून देण्यासाठी मतदारांना साद घालणार आहे.उद्धव ठाकरे यांच्या सभेच्या निमित्ताने जोरदार तयारी करण्यात येत आहे. ही सभा यशस्वी करण्यासाठी शिवसेनेची एक मोठी चमू प्रयत्नशील असून सभेच्या नियोजनाची ते आखणी करीत आहे. उद्धव ठाकरे यांच्या जाहीर सभेला सर्वसामान्य मतदार ,शिवसेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, समाजवादी पार्टी ,आप,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) व अन्य घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील खराटे यांनी एका प्रसिद्धी पत्रकारद्वारे केले आहे.

**राणा दाम्पत्य असणार टार्गेट**

माजी खा. नवनीत राणा आणि रवी राणा यांनी मातोश्रीवर जाऊन हनुमान चालीसा पठण केल्यामुळे राज्यातील राजकारणावर त्याचा प्रभाव पडला होता शिवाय उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतांना त्यांच्यावर अनेक आरोप प्रत्यारोप करून उद्धव ठाकरेंसारख्या स्वाभिमानी नेत्याला बदनाम करण्याचे कटकारस्थान राणा दाम्पत्याने केले होते.त्यापैकी नवनीत राणा यांना लोकसभेत धडा शिकविण्यात आला मात्र आता वेळ आहे रवी राणा यांना घरी बसवण्याची त्यामुळे राणा दाम्पत्य हे उद्धव ठाकरे यांचे टार्गेट असतील अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# गावगाड्यात रंगू लागली निवडणुकीची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

सद्यस्थितीत सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीचा माहोल आता खऱ्या अर्थाने सुरू झाला आहे. गावगाड्यातील राजकारण प्रचारादरम्यान तापू लागले आहे. निवडणुकीत रंग चढायला लागला



असून कार्यकर्तेही सज्ज झाले आहेत. गावागावातील चौकाचौकांत, कट्ट्याकट्ट्यावर, पारावरही सर्वत्र निवडणुकीची चर्चा रंगत आहे. सगळीकडे सारखीच स्थिती असते, मतदारसंघात उमेदवार कोणीही उभे राहो अन् कोणी बी निवडून येवो. 'पळसाला पाने तीनच' अशी अंतर्गत कुजबुजही मतदारांमध्ये होताना दिसून येत आहे. निवडणुकीच्या आखाड्यात फायनल झालेले उमेदवार नव्याने रंग भरणार आहेत.उमेदवार 'आर या पार' पवित्रा घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत.निवडणुकीचा आखाडा मंगळवारपासून तापायला लागला आहे चिन्ह वाटप झाले असल्याने राजकारणाचा खरा रंग दिसत आहे. लोकसभा निवडणुकीत बदललेली राजकीय समीकरणे, आरोप–प्रत्यारोप आता विधानसभा निवडणुकीत थोडे वेगळे आहेत. उमेदवारांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी आयुधे सज्ज केली आहेत.



# जरांगेंच्या निर्णयामुळे कार्यकर्त्यांचं नुकसान ...आम्ही व्यवस्थित डाव मारू : बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

मनोज जरांगे यांनी जो काही निर्णय घेतला आहे (निवडणूक न लढवण्याचा) त्याला फार उशिरा केला. एक तर कार्यकर्त्यांना अर्ज भरायला लावणे, ४ तारखेला आम्ही लिस्ट जाहीर करतो, असे सांगणे, नंतर पुन्हा दुसरी तारीख देणे, यामुळे कार्यकर्त्यांचे आर्थिक नुकसान झाले. हे कार्यकर्त्यांनीही बोलवून दाखवले आहे. असे बच्चू कडू यांनी म्हटले आहे. याशिवाय, निवडणुकीनंतर, सर्वांमध्ये मुख्यमंत्रीपदासाठी रस्सीखेच होईल आणि अशा परिस्थितीत आम्ही व्यवस्थित डाव मारू, असा विशअवासही बच्चू कडू यांनी व्यक्त केला आहे. ते अमरावतीत माध्यमांसोबत बोलत होते.



जरांगे यांच्या निवडणूक न लढवण्याच्या घोषणेसंदर्भात बोलताना बच्चू कडू म्हणाले, खरे तर तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. पण जो काही निर्णय घेतला, त्याला फार उशिरा केला. एक तर कार्यकर्त्यांना अर्ज भरायला लावणे. ४ तारखेला आम्ही लिस्ट जाहीर करतो, नंतर पुन्हा दुसरी तारीख देणे, यामुळे कार्यकर्त्यांचे आर्थिक नुकसान झाले. हे कार्यकर्त्यांनी बोलवूनही दाखवले. एक तर आपण सांगायला हवे होते की, निवडणूक लढणार नाही. आता तुम्ही निवडणुकीचे २५ टक्के, ५० टक्के पार्ट झाल्यानंतर सांगत आहात की आता नाही लढत. यात ज्या कार्यकर्त्यांनी इकडून तिकडून पैसे आणून खर्च केला होता, त्याला आर्थिक झळ बसली आहे.

कडू म्हणाले, त्यांची (जरांगे) एक गोष्ट मान्य आहे की, एका जातीवर निवडणूक होत नाही आणि एका जातीवर निवडणूक करण्याचा कुणी प्रयत्नही करू नये. कारण देशात जात आणि धर्म आणि पैसा या सगळ्या गोष्टींना दूर ठेवून राजकीय पक्षांना राजकारण करता येत नाही. ही सर्वात मोठी कमजोरी आहे. मात्र सगळे पक्ष धर्म, जात आणि पैसा सोडून जर उतरण्याची तयारी नसल्याने, संपूर्ण देशावर त्याचा मोठा परिणाम होत आहे.

लोक मूळ मुद्द्यांऐवजी नको ते मुद्दे बाहेर आणल्याने, आज अतिशय वाईट स्थिती देशात आहे. तुम्ही जर पाहिले, तर रुग्णालयांचे काय हाल आहेत, शाळांचे काय हाल आहेत, शेतीमालाला भाव नाही. या अनेक गोष्टी आपण पाहिल्या, तर याचा प्रचंड रोष लोकांमध्ये आहे. परंतु आम्ही राजकीय लोकांनी जाती-धर्माच्या मुद्द्यावर यश मिळवले आहे. यामुळे मूळ मुद्द्यांपासून दूर जात आहोत, असेही कडू यांनी म्हटले आहे.

किती जागा लढवणार आणि भविष्यात महायुती अथवा महाविकास आघाडीला पाठिंबा देण्याची वेळ आली तर आपले पर्याय खुले आहेत का? असे विचारले असता, कडू म्हणाले, आम्ही ४० जागा आता महाशक्तीमध्ये लढणार आहोत. संपूर्ण महाशक्ती १२१ जागा लढते आहे आणि यामध्ये खूप चांगल्या पद्धतीने काही जागेवर आम्ही विजय मिळवणार आहोत. आता राहिला प्रश्न पुढे काय करणार आहोत? तर मला वाटते आमचे सरकार बनेल. सगळ्यांची सांगड तुटेल. सगळ्यांमध्ये मुख्यमंत्रीपदासाठी रस्सीखेच होईल आणि अशा परिस्थितीत आम्ही व्यवस्थित डाव मारू, असा विश्वासही बच्चू कडू यांनी यावेळी व्यक्त केला.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी पूर्ण : विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

## निवडणूक आयोगाची छत्रपती संभाजीनगरला बैठक : जिल्ह्यातील निवडणुकीच्या पूर्व तयारीचा आढावा सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघासाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यानुषंगाने जिल्हा प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे. मतदान यंत्र, निवडणुकीसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ, यंत्रणा यासोबतच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत, अशी माहिती विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी दिली. निवडणूक आयोगाने संभाजीनगर येथे अमरावती विभागातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने आढावा घेतला. या बैठकीला श्रीमती पाण्डेय यांनी दूरदृश्यप्रणालीव्दारे सहभाग घेतला. यावेळी विशेष पोलीस



महानिरीक्षक रामनाथ पोकळे, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांच्यासह सामान्य निवडणूक निरीक्षक श्यामलाल पुनिया, बिधानचंद्र चौधरी, रवी राजन कुमार विक्रम, पोलीस निरीक्षक बत्तुला गंगाधर, खर्च निरीक्षक वेंकन्ना तेजावथ, डॉ. उमा माहेश्वरी आदी उपस्थित होते.डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, विधानसभा निवडणुकीसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहेत. त्यानुषंगाने फिरते पथक, स्थिर पथक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यासोबतच प्रत्यक्ष निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. पुढील आठवड्यात त्यांचे दुसरे प्रशिक्षण घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडण्यासाठी सुक्ष्म निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अमरावती, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यातील दूर्गम भागातील मतदान केंद्राशी संपर्क साधण्याची सुविधा वनविभाग व पोलीसांच्या संपर्क यंत्रणांच्या सहाय्याने कार्यान्वित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांना निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी भेटी देऊन याठिकाणच्या सोयी सुविधांची पाहणी करणार आहे. या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग यांना योग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यासोबतच निवडणूक कामांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सेक्टर ऑफीसर, पोलीस, होम गार्ड यांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात येणार आहे. ८५ वर्षावरील जेष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांसाठी गृह मतदान दि. ९ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे, याची राजकीय पक्षांना माहिती आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.निवडणुकीचया अनुषंगाने प्रशासनाने सर्व प्रक्रिया पूर्ण केली आहे. याचे दस्तावेज निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे तयार करण्यात आले आहे. यासोबतच मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी स्वीपचे उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रामुख्याने शहरी भागात आणि लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झालेल्या भागात लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. निवडणुका मुक्त आणि निर्भय वातावरणात होण्यासाठी फिरते पथक, स्थिर पथक, खर्च पथक प्रभावीपणे कार्य करीत आहे.

# श्री क्षेत्र जहागीरपूर येथून यशोमती ठाकूर यांच्या प्रचाराचा झंझावात

## नागरिकांशी साधला संवाद : गावोगावी महिलांकडून जंगी स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

महाविकास आघाडीच्या उमेदवार लोकनेत्या यशोमती ठाकूर यांच्या प्रचाराचा दुसरा दिवस श्री क्षेत्र जहागीरपूर येथून सुरू झाला. मारोतीरायचे दर्शन घेऊन जहागीरपूर येथून प्रचारयात्रा आज काढण्यात आली. या प्रचारयात्रेत तिवसा मतदार संघातील हजारो महिला पुरुषांनी सहभाग घेत यशोमती ठाकूर यांचे जंगी स्वागत केले. पुष्पवर्षाव करून यशोमती ठाकूर यांच्या पदयात्रेत महिलांनी मोठ्या संख्यने प्रचाराची धुरा सांभाळली. तिवसा विधानसभामतदार संघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर या काँग्रेस पक्षावर निवडणूक लढवीत आहे. त्यांनी आपल्या प्रचाराच्यादुसऱ्या दिवशी जहागिरपूर, कौडण्यपूर, जुनी शिदवादी, वंडली, शिदवादी, मूर्तिजापूर, धामंत्री, उंबरखेड, मारडा, काळा घोटा, कवाडगव्हाण, शेंदुरजना



महोरा, घोटा, भिवापूर, विरगव्हान या गावातून पदयात्रा काढून नागरिकांशी संवाद साधला.गावागावातून महिला, युवतींनी मोठ्या प्रमाणात यशोमती ठाकूर यांचे स्वागत केले. महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये असतांना यशोमती ठाकूर यांनी मोठ्या प्रमाणात विकास केल्याने परिसरातील नागरिकांनी हा विकासाचा झंझावात अविरत राहण्यासाठी पुन्हा यशोमती ठाकूर यांच्यावर विश्वास दाखवला. परिसरातील सर्वच तीर्थस्थळाला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून यशोमती ठाकूर यांनी धार्मिक स्थळांचा विकास केला. येणाऱ्या काळात महाविकास आघाडीचे सरकार येणार असून भविष्यात आणखी मोठा विकास करण्याचा मानस यशोमतीठाकूर यांनी व्यक्त केला. या पदयात्रेमध्ये महाविकास आघाडीतील सर्वच घटकपक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने प्रदीप राऊत, भूषण यावले, विलास माहूरे,प्रवीण मनोहर, तेजस्वीनी वानखडे, दिलीपराव शापामोहन, महादेवराव गारपवार, आसावरी देशमुख, सुनील किरटकर, दिलीप नहाटा, नरेंद्र राऊत, प्रकाश मक्रमपुरे, संजय मार्डीकर, सुरेश मेंटकर, रवी राऊत, सुरेश धवणे,शिरीष मोहोड, अभिजित बोके, सतीश पारधी, दिलेलं काळबांडे,मुकुंद देशमुख,रमेश कलाने, चंदूभाऊ वडस्कर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# चाकरमान्यांनो, मतदानासाठी पुन्हा गावाकडे परत या

## उमेदवारांची हाक : गावी आलेल्यांना कार्यकर्ते घालताहेत गळ

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**

शिक्षण, व्यवसाय, नोकरी, रोजगारासाठी शहरात गेलेले नागरिक दिवाळी साजरी करण्यासाठी गावाकडे परतले. दिवाळी साजरी करून ते परतीच्या मार्गावर लागली आहेत. परंतु २० नोव्हेंबर रोजी संपूर्ण राज्यात विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षाचे नेते मतदानासाठी पुन्हा गावाकडे या, अशी आर्त साद घालीत आहेत. काहींनी तर मतदारांना मतदानासाठी त्यांच्या मूळ गावी आणण्यासाठी व्यवस्था करण्याची रणनीतीही सुरू केली आहे.



अमरावती जिल्ह्यातील अनेक बेरोजगार युवक रोजगाराच्या शोधात पुणे, मुंबई,दिल्ली, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात वास्तव्यास आहेत, तर काहीजण बाहेरगावी कामानिमित्त इतर ठिकाणी आहेत. यातील बहुतांश जण दिवाळीसाठी आपल्या मूळ गावी आले आहेत. दिवाळी आटोपून अनेक जण परतीच्या प्रवासाला लागणार आहेत.त्यातच विधानसभा निवडणुकीचे वारे सुरू आहेत. त्यामुळे राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, उमेदवार दिवाळी साजरी करण्यासाठी आलेल्या नागरिकांची विचारपूस करून निवडणुकीच्या दिवशी मतदानाला मूळगावी परत येऊन मतदानाचा आग्रह धरत आहेत.

**पत्ता व मोबाइल नंबरची नोंद**

कामानिमित्त बाहेरगावी वास्तव्यास असलेल्या नागरिकांना स्वगावी निवडणुकीला मतदानासाठी बोलवायचे आहे. बरेच जण मूळ गावी आले आहेत. त्यांचा पत्ता, संपर्क क्रमांक नोंद करून घेण्याच्या कामात विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते लागले आहेत. निवडणुकीत त्यांना आणणे, नेण्याची व्यवस्था करण्यासाठी, त्यांच्याशी संपर्कात राहण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु, ते पुन्हा पंधरवड्यानंतर मतदानासाठी येणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे.





